Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# ग्रामीण जीवनाच्या वास्तवाचा वेध घेणारी कादंबरी 'बारोमास'

**डॉ.सुधाकर भिकाजी जाधव**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय मंठा जि. जालना

ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ धनुर्धारी रा.वी. टिकेक-यांच्या फिजी पाटील या कादंबरी पासून मानला जातो. तत्कालीन खेडे, ग्रामव्यवस्था, दैनंदिन वातावरण आणि वास्तवता यांचे दर्शन घडविणे ही या कादंबरी लेखनाची प्रेरणा असल्यामूळे या कादंबरीला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हटले जाते. म्हणजेच ग्रामीण कादंबरी वाङ्याचा प्रवास १९३० पासून आजतागायत सातत्याने सुरुच असल्याचे दिसते. एवढेच नव्हे तर आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने कादंबरी वाङ्या च्या कक्षा रुंदावल्याचे ही पहावयास मिळते.

इ.स. २००० नंतरच्या ग्रामीण कादंब-यांचा विचार करता असे लक्षात येते की, बदलत्या समाजजीवना बरोबरच ग्रामीण जीवनात अमुलाग्र बदल होत आहेत. झपाट्याने येणाऱ्या तंत्रज्ञानासमोर पारंपारिक शेती तग धरू शकत नाही तरीही तिला आई मानून तिच्याशी एकनिष्ठ राहणारी एक पिढी आणि बदलत्या जीवनाला उत्साहाने सामोरे जाणारी दुसरी पिढी या दोन पिढींमधील संघर्ष हा विषय प्रामुख्याने येऊ लागलेला आहे. या शिवाय बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रश्न पुर्वीच्या मानाने बदलले आहेत. त्यात ग्रामीण भागात येऊ लागलेल्या शासनाच्या विविध योजना, त्यात रखडलेला ग्रामीण समाज आणि शिक्षण असुनही नौकरी न मिळाल्यामूळे बेकार असलेल्या शेतक-यांच्या मुलांचे प्रश्न आजच्या कादंबऱ्यात येऊ लागले आहेत. २००१ साली प्रकाशीत झालेल्या 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतून भारत काळे यांनी ग्रामीण जीवनातील बदलते वास्तव मांडले आहेत.

इ. स. २००५ मध्ये लिहिलेल्या 'गावठान' या कादंबरीतून कृष्णात खोत यांनी स्त्री जीवनाचे दुःख व्यक्त केले आहेत. त्यांच्याच 'रौंदाळ' मध्ये बदलते राजकारण पार चुलीपर्यंत गेलेले पहावयास मिळते. भावाभावात आणि नवराबायकोत राजकारणामुळे कसा संघर्ष निर्माण होतो याचे वास्तव कृष्णात खोत 'रौंदाळ' या कादंबरीतून करतात. 'सारवर फेरा' या कादंबरीतून मोहन

पाटील उस शेतक-यांचे प्रश्न आणि सहकारातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण करतात तर सुशिक्षित शेतकरी तरुणांच्या वाताहतीची व्यथा मांडून खुल्या आर्थिक धोरणात दडपला गेलेला शेतकरी वर्ग व दयनीय स्थिती इ.स. २००२ मध्ये लिहिलेल्या 'बारोमास' या कादंबरीतून आलेली आहे. सदानंद देशमुख यांनी या कादंबरीतून ग्रामीण जीवनाच्या वास्तवाचा वेध घेतला आहे.

" ग्रामीण स्थित्यंतराशी निगडीत असे महत्वाचे विषय या काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी जसे समर्थपणे हाताळले त्याच प्रमाणे या स्थित्यंतरामुळे बदललेल्या ग्रामीण मनाचाही या काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी समर्थ पणे वेध घेतलेला आहे?" असे संदानंद देशमुखांच्या लेखना-विषयी म्हणावेसे वाटते.

जागतिकीकरणाच्या, खाजगीकरणाच्या काळात इतर क्षेत्राबरोबरच शेती (कृषी) क्षेत्राचीही होत असलेली पडझड 'बारोमास' या कादंबरीमधुन पाहवयास मिळते. विदर्भातील सांजोळ हे गाव या गावातील माणसे, त्यांचे प्ररस्परांतील संबंधही या कादंबरीतून सहजपणे व्यक्त होतात. गावातील तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, बैंक अधिकारी आणि आमदार ही सर्वच मंडळी एकमेकांच्या सहकार्याने भ्रष्ट कारभार करतात, गावातील शेतकऱ्याना त्यांच्या मुलांना फसवतात. ही लोकशाहीत चालवलेली फसवणुक सदानंद देशमुख वास्तव रुपाने मांडतात.

शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडतात त्यानंतर त्यांना नोकरी मिळविण्यासाठी वशीला आणि डोनेशन साठी अडवून रहावे लागते.वर्षाकाठी शेती मधून जगण्यापुरते उत्पन्न काढणाऱ्या आणि त्यातच कसे तरी जीवन जगणाऱ्या शेतक-याला आपल्या मुलाच्या नौकरीसाठी लाख-दोन लाख रुपये देणे शक्य नसते. त्यामुळे आयुष्यभर बेकारीची टांगती तलवार घेऊन जगाने लागतो, शिवाय उच्चशिक्षित मुलाबरोबर लग्न लावून देणाऱ्या मुलीचा बापाचा भ्रमनिरास होतो. उच्चाशिक्षित मुलांशी लग्न. करून आलेल्या पत्नीपुढे अनेक सुख स्वप्ने असतात परंतू नव-याला नौकरी न मिळाल्यामूळे तिच्या स्वप्नांचा चूराडा होतो. शहरात वाढलेल्या मुलीला एका खेड्यातली कष्टाची काम जमत नाहीत. अशा अनेक अडचणीला तिला सामोरे जावे लागते. त्यातच पावसाच्या अभावामुळे शेती तोव्यात येते, दुष्काळाचे सावट पुन्हा पुन्हा घेत राहते पैशाच्या अडचणीमुळे तिच्या गळ्यातील पोत मोडली जाते. त्यानंतर तिच्या हातातील बांगड्याची मागणी केली जाते तेव्हा ती अस्वस्थ होते, शिवाय या घरात तिला समजून घेणारे कोणीही नसते त्यामूळे नावीलाजाने ती हे घर सोडून जाते.

सांजोळ गावातील सुभानराव तनपुरे यांचे कुटुंब हे या कादंबरीच्या केंन्द्रस्थानी आहे. एकनाथ तनपुरे हा या कादंबरीचा नायक आहे. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही म्हणून तो शेती करायची असे ठरवतो तेव्हा त्याची शेतीकडे पाहण्याची दृष्टी बदलते. तो शेतीत विविध प्रकारचे प्रयोग करतो शेतकरी संघटनेचे नरुमाऊ, तेजराव तात्या, समाधान चांदणे यांच्या संपर्कात येतो, त्यांच्याशी शेतीच्या प्रश्नासंबंधी चर्चा करतो परंतू त्याच्या पत्नीला हे आवडत नाही. ती त्याला आपल्या वाटणीची शेती विकून शहरात कोणताही धंदा करू असा सल्ला देते. तिचा हा सल्ला एकनाथ मानत नाही. कारण शेतीवर त्याचा जीव असतो पण नंतर काही दिवसातच एकनाथच्या भावाला (मधू) नौकरीसाठी पैसे भरण्याची वेळ येते. तेव्हा मधू कल्याणीचा मळा असलेली शेत जमीनीवर कर्ज काढायला भाग पाडतो, परंतू पैसे भरुनही मधुला नौकरी मिळत नाही. ज्याच्याकडे पैसे दिले त्या उत्तम ठोकरेचा अपघाती मृत्यू होतो. त्याला दिलेले पैसे बुडतात.

कल्याणीचा मळा कायमचा दगडू मालकाकडे जातो. त्यामूळे एकनाथ अस्वस्थ होतो. तर त्याचे वडील सुभाना डोहात उडी घेऊन आत्महत्या करतात. हे या कादंबरीचे मुख्य कथानक आहे या कथानका भोवती विविध व्यक्तिरेखा फिरताना दिसतात. अलिकडच्या काळात शेतकऱ्याच्या आत्महत्या का होतात यावर या कादंबरीतून प्रकाश टाकला आहे. त्यामुळे या कादंबरीला समकालीन वास्तव मोडणारी कादंबरी म्हणून विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

शेती करतांना येणारे अनुभव अतिशय विदारक स्वरुपाचे आहेत याचे चित्रण या कादंबरीतून व्यक्त झाले आहेत. काहीही जवळ नसताना करावी लागणारी नांगरणी पेरणी ही शेतक-यांची आर्थिक विवचंना आहे. त्यातही पाऊस वेळेवर पडला नाही तर दुबार पेरणीची वेळ येते. यासाठी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते. अशावेळी सावकारह कोऱ्या स्टॅम्प पेपरवर सही घेतो किंवा शेती नावावर करून घेतो. बऱ्याच वेळा शेतक-याला कर्ज फेडण्यास विलंब झाल्याने सावकाराचे प्रशासाठीचे तगादे शेतक-याच्या मागे लागतात. तेव्हा या शेतक-याला आत्महत्येचा मार्ग जवळचा वाटतो. आज यात फार मोठ्या प्रमाणावर वाढ होताना दिसते आहे. हे भयान वास्तव 'बारोमास' या कादंबरीच्या निमित्ताने समाजायुढे साकार झाले आहे.

शेतकऱ्याची कमकुवत आर्थिक स्थिती हीच शेतकऱ्याच्या आत्महत्येला कारणीभूत आहे. एकीकडे सर्व आर्थिक बाबी सांभाळत कसा तरी कुटूंबांचा गाडा ओढण्याचे काम करत असतानांच दुसरीकडे त्याला अनेक शोषीत घटकानांही सामोरे जावे लागते. त्यात

कार्यकत्यापासून पुढा-यां पर्यत भ्रष्ट असणारे राजकीय घटक, खाजगी सावकार, शिक्षणाचा बाजार मांडलेले शिक्षण सम्राट अशा अनेक शोषण कर्त्याचा समावेश होतो. एकूणच यातून कथानकातील विविध नैतिकता याचे दर्शन घडते.

थोडक्यात ग्रामीण जीवनाचे प्रश्न समजावून घेऊन कथानकात लेखकाने केलेली मोडणी पाहिल्यास -खेड्यातील वास्तव रेखाटण्याबरोबरच जे कौटुंबिक जीवन कथानकातून येते ते वाचकाच्या मनाला हेलावून सोडणारे आहे. त्यासाठी समाजव्यवस्थेत आढळणाऱ्या व्यक्तिरेखांची अचूक निवड करण्यात सदानंद देशमुख कमालीचे यशस्वी ठरलेले आहेत. गावाकडच्या वातावरणात प्रत्ययास येणारे वास्तव हेच या कादंबरीचे बलस्थान आहे. तेथील प्रश्न मांडतानाच नाते संबंधांतील विखुरलेपण टिपण्याचे काम सहजतेने लेखकाने केले आहे. परिवर्तनाच्या संदर्भात निर्माण झालेले प्रश्न, जातियतेचे संदर्भ घेऊन दिनकरच्या माध्यमातून येते, तसेच मुलीसाठी तळमळणार निष्पाप मन शेवंतांच्या रुपाने येते, आपल्याला सुख मिळाले नाही म्हणून सर्वांवर सूड उगवणारा मधू बदलत्या स्त्रिचे प्रतिनिधीत्व करणारी आलका, शेतकरी कुटुंबातील सुशिक्षित तरुणांचा प्रतिनीधी एकनाथ अशा जवळ जवळ मुख्य-दुय्यम आणि उल्लेख असलेल्या व्यक्तिरेखांचा वापर करून अत्यंत प्रभाविपणे ग्रामीण जीवनाची वास्तवता सदानंद देशमुख यांनी 'बारोमास मधून मांडली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. देशमुख सदानंद, 'बारोमास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
२. देशमुख सदानंद, 'तहान' कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे
३. देशमुख सदानंद, 'गावकळा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे
४. देशमुख सदानंद, 'मेळवण',मेमला प्रकाशन,विजयनगर,२००८
५. देशमुख सदानंद, 'चारीमेरा' पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,२००८
६. देशमुख सदानंद, 'उठावण' शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर